महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक:-१४४२/समोवानि/२०२०/चोवीस** **दिनांक:-२३ ऑगस्ट,२०२३**

**-:प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय:- सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा २०२०**
**अंतिम निकाल (जाहिरात क्रमांक ५९/२०२१)**

**संदर्भ-** दिनांक २१ ऑक्टोबर,२०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०२० (जाहिरात क्रमांक -५९/२०२१) मधून दिनांक २१ ऑक्टोबर,२०२२ रोजी जाहीर करण्यात आलेल्या अंतिम निकालामध्ये माजी सैनिक उपलब्ध न झाल्याने त्यांचेऐवजी पर्यायी उमेदवारांची मागणी शासनाने दिनांक १२ मे २०२३ रोजीच्या पत्रान्वये आयोगास केली.त्याअनुषंगाने पर्यायी एकूण ०८ उमेदवारांची शिफारस शासनास करण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेच्या उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता नियुक्तीपूर्वी शासन स्तरावरुन मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत. सदर तपासणीत उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी/ शिफारस कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**३.** अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ व दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास (११ जानेवारी, २०२२) किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

**४.** उमेदवारांच्या माहितीसाठी शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**उपसचिव (परीक्षोत्तर अराजपत्रित)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**